महाराष्ट्र शासन
ग्रामविकास विभाग

अत्यंत महत्वाचे -तात्काळ

फोन क्र. :- ०२२-२२०१३७८१
Email ID : vijaykant.chandekar@nic.in

क्र.संकिर्ण-२०१९/प्र.क्र.१६३ /आस्था-८
बांधकाम भवन, २५,मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४००००१
दिनांक :- २६/११/२०२१

---

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद (सर्व).

विषय :- अधिसंख्य पदावरील नियुक्त्यांना मुदतवाढ देताना एक दिवसाच्या तांत्रिक खंडाबाबत.

संदर्भ:-१)सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दि.२१.१२.२०१९, दि.२७.११.२०२० व दि.२८.१०.२०२१.
२)मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी यांजकडील पत्र क्र.रजिप/साप्रवि/आस्था-४/४४८१/२०२१ दि.०६.१०.२०२१.

महोदय,

मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपिल क्र.८९२८/२०१५ (चेअरमन ॲन्ड मॅनेजिंग डायरेक्टर,एफसीआय आणि इतर विरुध्द जगदिश बालाराम बहिरा व इतर) व इतर याचिका यामध्ये दि.६ जुलै,२०१७ रोजी मागास जातींना असलेल्या आरक्षणाच्या आधारे शासकीय सेवेत दाखल झालेल्या व त्यानंतर जातीचे दावे अवैध ठरलेल्या व्यक्तींना शासकीय सेवेत संरक्षण देय ठरत नसलेबाबतचा निर्णय दिला आहे.

त्याअनुषंगाने अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्याच्या कारणास्तव सामान्य प्रशासन विभागाकडील दि.२१ डिसेंबर २०१९, दि.२७.११.२०२० व दि.२८.१०.२०२१ या शासन निर्णयान्वये अधिसंख्य पदावर सेवा वर्ग करण्यात येणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संख्येइतकी, असे अधिकारी व कर्मचारी सध्या ज्या पदावर कार्यरत असतील त्या पदाचे अधिसंख्य पद निर्माण करुन तसेच शासन निर्णयापूर्वी सेवामुक्त करण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचारी सेवा

समाप्तीपूर्वी ते ज्या पदावर कार्यरत होते त्या पदाचे अधिसंख्य पद निर्माण करुन त्यांना मानवतावादी दृष्टीकोनातून तसेच प्रशासनाची होणारी अडचण दूर करण्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्यांकरिता किंवा ते सेवेत राहिले असते तर ते ज्या दिनांकाला सेवानिवृत्त झाले असते त्या दिनांकापर्यंत निर्देश देण्यात आले आहेत.

तसेच सामान्य प्रशासन विभागाकडील दि.२७/११/२०२० व दि.२८.१०.२०२१ चे शासन निर्णयान्वये मुदतवाढ देण्यात आली आहे. अधिसंख्य पदावर सेवा वर्ग करण्यात येणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या नियुक्तीमध्ये एक दिवसाचा खंड दिला असल्याचे शासनाकडे तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

सदर बाबत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद (सर्व) यांना सूचित करण्यात येते की, अधिसंख्य पदावरील तात्पुरत्या स्वरुपातील ११ महिन्यांचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर नव्याने पुढील तात्पुरत्या स्वरुपातील ११ महिन्यांकरीता सुधारीत आदेश देताना एक दिवसाचा तांत्रिक खंड देण्याबाबत उपरोक्त शासन निर्णयामध्ये कुठेही उल्लेख नाही. तरी अधिसंख्य पदावरील कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देताना एक दिवसाचा तांत्रिक खंड देण्यात येऊ नये.

आपला,

(विजय चांदेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:- निवड नस्ती.